# महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक
MAHARASHTRA UNIVERSITY OF HEALTH SCIENCES, NASHIK
दिंडोरी रोड, म्हसरुळ, नाशिक - ४२२००४ Dindori Road, Mhasrul, Nashik - 422004
Tel:(0253) 2539325 / 6659325 ☎ Student Helpline:0253-2539111/6659111/100
Website: www.muhs.ac.in, E-mail: academicallied@muhs.ac.in
MUHS

**डॉ. राजेंद्र शिवाजी बंगाळ**
एम.बी.बी.एस.,एम.डी.(न्यायवैद्यकशास्त्र),डी.एन.बी.,एलएल.बी.
**कुलसचिव**

**Dr. Rajendra Shivaji Bangal**
M.B.B.S.,M.D.( Forensic Medicine), D.N.B., LL..B.
**Registrar**


जा.क्र. मआविवि/पदवी/ई-६/ ६२२ /२०२६ दि. १६/०८/२०२६

**परिपत्रक क्र. ६६ /२०२६**

**प्रति:-**
**अधिष्ठाता/प्राचार्य,**
विद्यापीठ संलग्नित तत्सम विद्याशाखेंतर्गत
भौतिकोपचार पदवी व पदव्युत्तर महाविद्यालये,
मआविवि, नाशिक

**विषय** : भौतिकोपचार (Physiotherapy) या पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाचा (National Commission for Allied and Healthcare Professions) या केंद्रिय परिषदेने लागु केलेला अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून अंमलात आणणेबाबत...

**संदर्भ** :
१) दि. २८/०३/२०२१ रोजी प्रसिध्द झालेले भारत राजपत्र
२) वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्य विभाग, मुंबई यांची दि. १०/१०/२०२४ रोजीची अधिसुचना
३) राष्ट्रीय सहबध्द आणि स्वास्थ देख-रेख वृत्ती आयोगाची दि. २४/०४/२०२५ रोजीची सुचना
४) राष्ट्रीय सहबध्द आणि स्वास्थ देख-रेख वृत्ती आयोगाने दि. १५/१०/२०२५ रोजीची सुचना
५) राष्ट्रीय सहबध्द आणि स्वास्थ देख-रेख वृत्ती आयोगाने दि. २९/१०/२०२५ रोजीची सुचना
६) राष्ट्रीय सहबध्द आणि स्वास्थ देख-रेख वृत्ती आयोगाने दि. ०८/०४/२०२५ रोजीची सुचना
७) राष्ट्रीय सहबध्द आणि स्वास्थ देख-रेख वृत्ती आयोगाने दि. १५/०५/२०२६ रोजीची सुचना
८) अलाईड ॲण्ड हेल्थकेअर परिषदेचे पत्र क्र. अलाईड ॲण्ड हेल्थकेअर परिषद/२५/२०२६ दि.१८/०५/२०२६
९) अलाईड ॲण्ड हेल्थकेअर परिषदेचे पत्र क्र. अलाईड ॲण्ड हेल्थकेअर परिषद/३०/२०२६ दि. ०३/०६/२०२६
१०) वैद्यकयि शिक्षण व औषधी द्रव्य विभाग, मुंबई यांचे दि. ०४/०६/२०२६ रोजीचे पत्र
११) विद्यापरिषदेची दि.३०/०६/२०२६ रोजीच्या बैठकीतील ठराव क्र.५२०/२०२६

महोदय/महोदया,

उक्त विषयास अनुसरुन, सर्व संलग्नित महाविद्यालयांना कळविण्यात येते की, विद्यापीठामार्फत संलग्नित भौतिकोपचार विद्याशाखेच्या महाविद्यालयांना संलग्निकरण प्रदान करण्यात येते. सदर महाविद्यालयांमध्ये राबविण्यात येणाऱ्या अभ्यासक्रमास आजपर्यंत कोणतीही परीषद अस्तीत्वात नव्हती. त्यामुळे विद्यापीठाच्या विविध प्राधिकरणांनी मान्यता दिलेला अभ्यासक्रम व परिक्षा पध्दती लागु करण्यात आलेली होती.

तथापि, भारत सरकारने दि.२८/०३/२०२१ रोजीच्या राजपत्रानुसार National Commission for Allied and Healthcare Professions ही केंद्रिय परिषद गठीत केली असुन भौतिकोपचार पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी नियमावली लागु केली आहे. तसेच संदर्भ क्र. ०२ च्या पत्रांन्वये महाराष्ट्र शासनाने देखील सदर नियमावली लागु करण्याच्या अनुषंगाने दि. १०/१०/२०२४ रोजीच्या पत्रांन्वये अधिसुचना प्रसिध्द केलेली आहे. सदर नियमावली National Commission for Allied and Healthcare Professions या केंद्रिय परिषदेच्या दि.२४/०४/२०२५ व दि. १५/१०/२०२५ रोजीच्या सुचनेनुसार शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासुन जशाच्या तशी लागु

करणे आवश्यक आहे. त्याअनुषंगाने सदर विषय दि.३०/०६/२०२६ रोजीच्या विद्यापरिषदेच्या बैठकित विचारार्थ ठेवण्यात आला असता, विषय क्र.५२०/२०२६ अन्वये खालीलप्रमाणे ठराव पारीत करण्यात आला आहे.

**ठराव क्र. ५२०/२०२६**

*"भारत सरकारने दि.२८/०३/२०२१ रोजीच्या राजपत्रानुसार National Commission for Allied and Healthcare Professions ही केंद्रिय परिषद गठीत केली असुन भौतिकोपचार व व्यवसायोपचार पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी नियमावली लागु केलेली आहे. तसेच दि.२४/०४/२०२५ रोजीच्या पत्रांन्वये महाराष्ट्र शासनाने देखील सदर नियमावली लागु करण्याच्या अनुषंगाने दि. १०/१०/२०२४ रोजीच्या पत्रांन्वये अधिसुचना प्रसिध्द केलेली आहे. सदर नियमावली National Commission for Allied and Healthcare Professions या केंद्रिय परिषदेच्या दि.२४/०४/२०२५ व दि. १५/१०/२०२५ रोजीच्या सुचनेनुसार राजपत्र निर्गमीत झाल्यानंतर शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासुन जशाच्या तशी लागु करणे आवश्यक आहे. केंद्रिय परिषदेद्वारे प्राप्त अभ्यासक्रमाच्या नियमावलीचे अनुषंगाने सखोल चर्चा करण्यात आली, अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून लागु करण्यात यावे"*

सर्व महाविद्यालयांनी संदर्भीय पत्रांचे, सुचनांचे अवलोकन करुन National Commission for Allied and Healthcare Professions या केंद्रिय परिषदेने लागु केलेला भौतिकोपचार पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम जसेच्या तसे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून अंमलात आणण्याची कार्यवाही करण्यात यावी. इतर बाबत केंद्रीय परिषदेकडून जसे निर्देश प्राप्त होतील तसे महाविद्यालयांना स्वतंत्र परिपत्रकाद्वारे कळविण्यात येईल.

आपला

17-08-26

कुलसचिव

Maharashtra University Of Health Sciences R.O. Nashik

कुलसचिव
महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ,
नाशिक

17 AUG 2026

**प्रत माहितीस्तव :**

१) मा. कुलगुरु यांचे कार्यालय

२) कुलसचिव यांचे कार्यालय